# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड सार्वजनिक बांधकाम विभाग

**Tender Notice No.:- NWCMC/(PWD) E-Tender/Rate list/16050 /2019 Dt: 02.02.2019**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, हद्दितील रस्त्यावरील विविध ठिकाणचे खड्डे बुजविणे कामे करणेकरिता आवश्यक बाबीकरिता कामाचा पुरेसा अनुभव असलेल्या कंत्राटदार यांचे कडुन विहित नमुन्यात दोन लिफाफा पध्दतीने ई-दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

**ई-दरपत्रक प्रक्रियेचे वेळापत्रक**

| अ.क्र. | तपशिल | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | ई- दरपत्रक प्रकशित करणे | 04.02.2019 | 15.00 |
| २ | ई- दरपत्रक डाऊनलोड करणे | 04.02.2019 | 15.00 |
| ३ | ई- दरपत्रक भरणे | 04.02.2019 | 15.00 |
| ४ | ई- दरपत्रक भरण्याचा अंतिम दिनांक व वेळ | 11.02.2019 | 15.00 |
| ५ | ई- दरपत्रक उघडणे | 12.02.2019 | 15.00 |

| अ. क्रं. | कामाचे नांव | कोरी दरपत्रकाची किंमत | इसारा रक्कम रु. | सुरक्षा अनामत रक्कम रु. | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | नांवाशमनपा, हद्दितील रस्त्यावरील विविध ठिकाणचे खड्डे बुजविणे | १०००/- + २८० (GST) =१२८० | 150000/- | 300000/- | 1 वर्ष |

ई-दरपत्रक माहिती व अटी व शर्ती

| | |
|---|---|
| १ | वरील कामाची ई-दरपत्रक प्रक्रिया संगणकावर ई-दरपत्रक प्रक्रियेद्वारे online पाहता येईल. या ई-दरपत्रके संबंधी या पुढील सर्व सुचना /शुध्दीपत्रके ई-इंटरनेटच्या उपयोगाचे ऑनलाईन करण्यात येईल. |
| २ | वरील कामाची संपुर्ण माहिती http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. |
| ३ | निविदा बाबत आवश्यक बाबी (Annexure-I)<br>A) महाराष्ट्र शासन PWD यांचेकडील योग्य त्या वर्गातील नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत सादर करणे आवश्यक आहे. (कमीत कमी 150.00 लक्ष)<br>B) ई-दरपत्रक धारकाने कोरी निविदेची किंमत **(Tender fee)** व इसारा रक्कम **(EMD)**ची रक्कम **ONLINE Payment Gateway द्वारे भरणा** करावी.<br>C) G S T नोंदणी प्रमाणपत्र ना देय दाखला.<br>D) कामाचे अनुभव प्रमाणपत्र<br>E) आवश्यक असलेल्या यंत्रसामुग्री /साहित्य.<br>F) कंत्राटदाराने त्यांना मिळालेल्या कामात जर (१०) पेक्षा अधिक कामगाराचा समावेश असेल तर अशा निविदेत संबंधित कामगारांचा EPF व ESIC भरण्याची जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील,<br>G) फर्मच्या लेट पॅटवर कामाच्या अटी व शर्ती मान्य असल्याचे घोषणापत्र<br>H) कंत्राटदाराने सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र 500/- रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर लिफाफा क्र. 1 मध्ये जोडणे बंधनकारक आहे. निविदेतील लिफाफा क्र. 1 मध्ये तसेच निविदा मंजुरी व नंतर देयके अदा करताना जोडलेली कागदपत्रे खोटी व बनावट असल्याची बाब निविदा उघडल्या नंतर निदर्शनास आल्यास कंत्राटदार पूर्णपणे जबाबदार राहतील. मनपाचे कोणताही अधिकारी जबाबदार असणार नाहीत.<br>उपरोक्त A ते H मधील कागदपत्राच्या छायांकित प्रती स्कॅन करुन अपलोड कराव्या लागतील. तसेच ई-दरपत्रक सोबत देण्यात आलेल्या BOQ-File मध्येच दर भरुन वेबसाईटवरअपलोड करावे.सदरील दर हे सर्वखर्चासहित समाविष्ठअसावेत. |
| ४ | उपरोक्त कागदपत्रे सादर करण्यात कोणतीही वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही. |
| ५ | लिफाफा क्र. १ कंत्राटदार याचे वर उल्लेख केलेली A ते H ही कागदपत्रे दि. 12.02.2019 दुपारी 15.00 वाजेपर्यंत कार्यकारी अभियंता, नांवाशमनपा, नांदेड येथे समक्ष आणुन द्यावे लागेल. |
| ६ | पुर्ण माहिती भरलेली लिफाफा क्र. १ ची तपासणी दि. 13.02.2019 रोजी दुपारी १३.०० वा. कार्यकारी अभियंता, नांवाशमनपा, नांदेड येथे केली जाईल. तपासणी अंती पात्र दरपत्रक धारकांची दरपत्रक प्रक्रियेसाठी विचार करण्यात येईल. |

| | |
|---|---|
| ७ | लिफाफा क्र. १ ची तपासणी केल्यानंतर पात्र कंत्राटदार यांचा लिफाफा क्र. २ BOQ-File दि. **14.02.2019** रोजी दुपारी १५.०० वाजता उघडण्यात येईल. |
| ८ | दरपत्रक धारकाने दरपत्रकेत कोणतीही सुचना/अट समाविष्ट केल्यास ती दरपत्रक अपात्र ठरविण्यात येईल. |
| ९ | आवश्यकतेनुसार कामा बाबत मा. आयुक्त यांचे सुचनांचे पालन करावे लागेल. |
| १० | ई-दरपत्रक मंजुर झालेल्या ठेकेदाराने मा. आयुक्त, नांवाशमनपा, नांदेड यांनी ठरवुन दिलेल्य विहित नमुन्यात रु. १०००/- (रु. एक हजार फक्त) च्या स्टॅम पेपरवर करारनामा करणे आवश्यक आहे. |
| ११ | ई-दरपत्रकाच्या देयकातुन नियमानुसार सर्वकर तसेच आयकर व त्यावरील अतिरिक्त कर (surcharge) कपात करण्यात येईल. ठेकेदारास कोणत्याही प्रकारचे अग्रिम देण्यात येणार नाही. |
| १२ | कोणत्याही अटीच्या अर्थाबद्दल किंवा इतर कोणत्याही बाबतीत विवाद उद्‌भवल्यास मा. आयुक्त, नांवाशमनपा, नांदेड यांचा निर्णय अंतीम व बंधनकारक राहील. |
| १३ | दरपत्रक धारकाने दर नमुद करताना त्यामध्ये कामासाठी येणारा सर्व खर्च व भरावे लागणारे वेगवेगळे कर इ. बाबी विचारात घेऊन दर नमुद करावा. यशस्वी दरपत्रक धारकास या कार्यालयाकडुन कोणतेही शासकीय/ निमशासकीय कराची रक्कम देण्यात येणार नाही. आणि त्या बाबतच्या माफीचे कोणतेही प्रमाणपत्र देण्यात येणार नाही तसेच नियमानुसार सर्वकर, आयकर व लागु असणारे इतर कर वजा करुन देयक अदा करण्यात येईल. |
| १४ | सदर दरपत्रके संदर्भातील कोणताही न्यायालयीन खटला नांदेड जिल्हा न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात चालविला जाईल. |
| १५ | सदरची दरपत्रक अगर दरपत्रकातील कोणताही भाग तसेच कोणत्याही अटी व शर्तीमध्ये कोणतीही पुर्व सुचना न देता रद्द करणेचा/राखुन ठेवणेचातसेच सुधारणा करणेचा हक्क मा.आयुक्त,नांवाशमनपा, नांदेड यांनी राखुन ठेवला आहे. |
| १६ | कामांच्या बाबींचे नमुने (टेस्ट रिपोर्ट) वारंवारीतेनुसार सादर करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील. |
| १७ | कंत्राटदाराने बाबींच्या पृथ्थकरणानुसार काम करणे बंधनकारक राहील. कंत्राटदारास सा.बां. विभागाच्या Standard specification व MORTH specification प्रमाणे देखभाल दुरुस्ती कामे करणे बंधनकारक राहील. |
| १८ | काम करण्यापुर्वीची व काम पुर्ण झाल्यानंतरची कामाची Geotag फोटो काढणे कंत्राटदारास बंधनकारक राहील. |
| १९ | देखभाल दुरुस्ती काम वेळेत पुर्ण न केल्यास कामाच्या किंमतीच्या अर्धा टक्का दंड आकारण्यात येईल. |
| २० | उप अभियंता/कनिष्ठ अभियंता याचे आदेशानुसार गुणवत्तेने काम करणे बंधनकारक राहील. |
| २१ | दरपत्रकातील बाबीं शिवाय इतर बाबीं (अतिरीक्त) करण्यास आदेशीत केल्यास अतिरीक्त बाबीं करणे दरपत्रक धारकांस बंधनकारक राहील. सदर अतिरीक्त बाबींचे दर हे सा.बां. विभागाच्या प्रचलित राज्य दरसुची प्रमाणे किंवा प्रचलीत बाजार भावा प्रमाणे अदा करण्यात येईल. |

**कार्यकारी अभियंता,**
सार्वजनिक बांधकाम विभाग,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड

**प्रतिलिपी :-**

१. नोटीस बोर्ड, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
२. ई-टेंडरींग विभाग/संगणक विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड